1

258

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व. का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १६/०२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,गृह विभाग,निर्णय क्र : एमआयएस-१२२३/प्र.क्र.१७०/विशा-५, दि. १४/०२/२०२४.

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत गठीत सार्वजनिक मनोरंजन नियमांखालील परवान्यासंदर्भातील अपिलांवर सुनावणी घेण्याचे शासनाचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करणेबाबत.

******

<u>परिपत्रक</u> -

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र : एमआयएस - १२२३/प्र.क्र.१७०/२४/विशा-५, दि. १४.०२.२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२१४१८५७२४८४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,
पोलीस आयुक्त बृहन्मुंबई (सस्नेह).
पोलीस आयुक्त (ठाणे शहर/ नवी मुंबई/ पुणे/ पिंपरी चिंचवड/ मिरा भाईंदर/ नागपूर/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ सोलापूर शहर, अमरावती ).



Scanned with CamScanner

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत गठीत सार्वजनिक मनोरंजन नियमांखालील परवान्यासंदर्भातील अपिलांवर सुनावणी घेण्याचे शासनाचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआयएस-१२२३/प्र.क्र.१७०/विशा-५**
मुख्य इमारत, दुसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १४ फेब्रुवारी, २०२४

**वाचा -** कार्यालयीन आदेश, क्र. गृहआ-२०२०/प्र.क्र.१०९/आस्था-२, दि. २९.०९.२०२२

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत गठीत सार्वजनिक मनोरंजन नियमांखालील परवान्यासंदर्भातील अपिलांवर सुनावणी घेण्याचे शासनाचे अधिकार उपरोक्त कार्यालयीन आदेशान्वये प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा) यांना प्रदान करण्यात आले होते. सदर अपिलांवरील सुनावणीचे अधिकार क्षेत्रिय स्तरावर सुपुर्द केल्यास सार्वजनिक मनोरंजन नियमाखालील परवान्यांचे नियमन करणे सुलभ व संयुक्तिक होईल. यास्तव सदर अधिकार क्षेत्रिय स्तरावर सुपुर्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३३(१) (वाय) मधील तिस-या परंतुकातील तरतूद विचारात घेता, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ कलम ३३, उपकलम (१) मधील खंड (डब्लू), (डब्लू ए), (डब्लू बी), (एक्स), (एक्स ए), (वाय) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सार्वजनिक मनोरंजनाच्या जागांसाठी आणि कॅब्रे नृत्याचे कार्यक्रम, डिस्कोथेक, खेळ, मेळे व तमाशे यांसहित सार्वजनिक मनोरंजनाच्या कार्यक्रमांसाठी / जागेसाठी (सिनेमाव्यतिरिक्त) परवाना देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे याकरिता नियम तयार करण्यात आले आहेत. सदर नियमांतर्गत येणा-या परवान्यासंदर्भात दाखल होणा-या सर्व अपिलांवर सुनावणी घेण्याचे शासनाचे अधिकार, यापुढे संबंधित विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच उपरोक्त वाचा येथील कार्यालयीन आदेश या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

२.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०२१४१८५७२४८४२९ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

GANESH MOHAN KATHAWATE

Digitally signed by GANESH MOHAN KATHAWATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=a08089dc010cecf37359d48237bde2fdabcef712865c52665157157cefbb8037, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9F40BA5D0001001E5D7FB08F1F09FA7254742312881F9048102F68CD0ED7649F, cn=GANESH MOHAN KATHAWATE
Date: 2024.02.14 19:06:53 +05'30'

( गणेश काथवटे )
अवर सचिव, गृह विभाग

प्रत-

१. मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव
२. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
३. प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
४. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड, मिरा भाईंदर, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर शहर, अमरावती.
८. सर्व जिल्हाधिकारी
९. सहसचिव (विशा-५), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१०. विशा-५ कार्यासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.

Scanned with CamScanner